सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७ /२०२५, मुंबई, ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ:-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक सीसीटी-३६१६/ प्र.क्र.७६/ भाग-७/ E-७५२२४०/पोल-३, दि.०७/११/२०२५

**विषय :-** पुणे व पिपंरी-चिंचवड शहर सीसीटीव्ही प्रकल्पासाठी सल्लागार म्हणून मे. पीडब्ल्युसी या कंपनीला मुदतवाढ देण्याबाबत.

*****

महाराष्ट्र शासन,गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक सीसीटी-३६१६/ प्र.क्र.७६/भाग-७/E-७५२२४०/पोल-३, दि.०७/११/२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५११०७१६१९३६५६२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
PRAVIN MADHUKAR SHIKHARE
Date: 12-11-2025 14:53:32

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,
कार्यासन अधिकारी, का.क्र. १७

प्रत,
अपर पोलीस महासंचालक (नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस आयुक्त, पुणे शहर
पोलीस आयुक्त, पिपंरी चिचवड
सहायक पोलीस महानिरीक्षक ( नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक,यांचे उपसहायक ( पुनर्रचना.),
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**पुणे व पिंपरी-चिंचवड शहर सीसीटीव्ही प्रकल्पासाठी सल्लागार म्हणून मे.पीडब्ल्युसी या कंपनीला मुदतवाढ देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः सीसीटी-३६१६/प्र.क्र.७६/भाग-७/E-७५२२४०/पोल-३**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
दुसरा मजला, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : ०७.११.२०२५.

**वाचा :**

१. शासन निर्णय, माहिती व तंत्रज्ञान विभाग क्र. GAD-मातंस ०८०/४/२०१४-O/o Directorate of IT-DIT (MH), दि.०१.०७.२०१४.
२. शासन निर्णय, गृह विभाग क्र. गृहआ २०१५/प्र.क्र.२३०/आस्था-२, दि.२०.५.२०१५.
३. शासन निर्णय, गृह विभाग क्र. सीसीटी ३६१५/प्र.क्र.९३/पोल-३, दि.२९.५.२०१५.
४. शासन निर्णय, गृह विभाग क्र.सीसीटी ३६१६/प्र.क्र.७६/भाग-१/पोल-३, दि.२५.७.२०१६.
५. शासन निर्णय, गृह विभाग क्र.सीसीटी ३६१६/प्र.क्र.७६/भाग-१/पोल-३, दि.२८.९.२०२२.
६. शासन निर्णय, माहिती तंत्रज्ञान विभाग क्र. GAD मातंसं ०८०/४/२०१४-O/O, दि.०९.०५.२०१९.
७. शासन परिपत्रक, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, No. GAD-IT ०८०/४/२०१४-O/O, Directorate of IT DIT (MH) Dt.२४.४.२०२३ व Dt. ५.१०.२०२३
८. शासन निर्णय, गृह विभाग क्र.सीसीटी ३६१६/प्र.क्र.७६/भाग-७/पोल-३, दि.२.८.२०२३, दि.१२.२.२०२४, दि.४.१२.२०२४.
९. गृह विभाग, उच्च स्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या (HPC) दि.२२.७.२०२५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.
१०.अपर पोलीस महासंचालक, (नि. व स.) यांचे पत्र क्र.पोमसं ११७/६१६२/पुणे सीसीटीव्ही/३५/२०२१ दि.३०.९.२०२५ रोजीचे पत्र.

**प्रस्तावना :**

पुणे व पिंपरी चिंचवड शहर सीसीटीव्ही प्रकल्पासाठी सल्लागार म्हणून मे. पीडब्ल्युसी (PricewaterhouseCoopers (PwC)) या कंपनीची शासन निर्णय, गृह विभाग समक्रमांक दि.२९.०५.२०१५ अन्वये दि.३०.०४.२०१६ पर्यंत नेमणूक करण्यात आली होती. त्यानंतर संदर्भाधीन शासन निर्णयान्वये/पत्रान्वये पुढीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात आली असून त्यांच्या सल्लागारांच्या सेवा घेण्यात आलेल्या आहेत :-

| अ. क्र. | सल्लागारास मुदतवाढ दिल्याच्या शासन निर्णयाचा/ शासन पत्राचा दिनांक | नियुक्त केलेल्या सल्लागाराचा तपशिल (पद व संख्या) | कालावधी |
|---|---|---|---|
| १ | २५.७.२०१६ | १ वरिष्ठ सल्लागार | दि.१.५.२०१६ ते ३१.१०.२०१६ |
| २ | ५.६.२०१७ | १ वरिष्ठ सल्लागार | दि.१.११.२०१६ ते ३०.६.२०१७ |
| ३ | २५.७.२०१७ | १ वरिष्ठ सल्लागार | दि.१.७.२०१७ ते ३०.६.२०१८ |
| ४ | १३.१२.२०१८ | १ वरिष्ठ सल्लागार व १ सल्लागार | दि.१.७.२०१८ ते ३०.६.२०१९ |
| ५ | २३.१०.२०१९ | १ वरिष्ठ सल्लागार व १ सल्लागार | दि.१.७.२०१९ ते ३०.१०.२०२० |
| ६ | ११.६.२०२१ | १ वरिष्ठ सल्लागार व १ सल्लागार | दि. १.११.२०२० ते ३०.६.२०२१ |
| ७ | २४.११.२०२१ | १ वरिष्ठ सल्लागार व १ सल्लागार | दि. १.७.२०२१ ते ३१.१०.२०२१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | २.२.२०२२ | १ वरिष्ठ सल्लागार व १ सल्लागार | दि.१.११.२०२१ ते २१.१.२०२२ |
| ९ | ९.५.२०२२ | १ वरिष्ठ सल्लागार | दि.१.२.२०२२ ते ३०.४.२०२२ |
| १० | २८.९.२०२२ | १ व्यवस्थापक सल्लागार व १ वरिष्ठ सल्लागार | दि.१.५.२०२२ ते ३१.३.२०२३ |
| ११ | २.८.२०२३ | १ व्यवस्थापक सल्लागार व १ वरिष्ठ सल्लागार | दि.१.४.२०२३ ते १९.९.२०२३ |
| १२. | १२.२.२०२४ | १ वरिष्ठ सल्लागार, १ सल्लागार व १ सल्लागार (आरएफपी प्रसिध्द केल्यानंतर) | दि.२०.९.२०२३ ते ३०.६.२०२४ |
| १३ | १०.१२.२०२४ | १ वरिष्ठ सल्लागार,१ सल्लागार व १ सहयोगी सल्लागार | दि. १.७.२०२४ ते ३०.६.२०२५ |
| *१४* | *दि.२२.७.२०२५ रोजीच्या उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या बैठकीतील निर्णयानुसार प्रस्तावित* | *१ वरिष्ठ सल्लागार व २ सल्लागार आणि १ सहयोगी सल्लागार* | *दि.१.७.२०२५ ते ३०.६.२०२६* |

२. पुणे व पिंपरी-चिंचवड शहर सीसीटीव्ही प्रकल्प कार्यान्वयन कालावधी दरम्यान शासनास व पोलीस प्रशासनास तांत्रिक सहाय्य करण्यासाठी सल्लागारांची आवश्यकता आहे. त्यानुषंगाने दि.२२.७.२०२५ च्या उच्च स्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या बैठकीमध्ये मे.पीडब्ल्युसी कंपनीला पुणे व पिंपरी-चिंचवड शहर सीसीटीव्ही प्रकल्पासाठी सल्लागार म्हणून मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**<u>शासन निर्णय</u> :-**

अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि.२२.७.२०२५ रोजीच्या बैठकीत पुणे व पिंपरी चिंचवड शहर सीसीटीव्ही प्रकल्पासाठी सल्लागार म्हणून मे. पीडब्ल्युसी कंपनीकडून एक वरीष्ठ सल्लागार, दोन सल्लागार व एक सहयोगी सल्लागार यांच्या सेवा दि.०१.०७.२०२५ ते ३०.०६.२०२६ या कालावधीसाठी घेण्याकरिता माहिती तंत्रज्ञान विभागाच्या शासन परिपत्रक क्र. **GAD-IT080/4/2014-O/O, Directorate of IT - DIT (MH), Dt. 5.10.2023** मधील तरतूदीनुसार मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. उच्च शक्ती प्रदत्त समितीच्या निर्णयानुसार उपरोक्त मुदतवाढ देण्यात आली असून भविष्यात कामाच्या स्वरूपानुसार सल्लागाराच्या संख्येत कपात करण्याचे तसेच, देण्यात आलेल्या मुदतवाढीच्या कालावधीपुर्वी मुदतवाढीचा कालावधी कमी करण्याचे अधिकार शासनास /उच्च शक्ती प्रदत्त समितीस राहतील.

३. सर्व सल्लागारांना देण्यात येणारे मानधन हे दरमहा-प्रति व्यक्ती (Man-Month) तत्वानुसार असेल. सर्व सल्लागारांची दरमहा देयके शासनास सादर करतांना सल्लागारांनी उद्दीष्टपूर्तीच्या अनुषंगाने महिन्याच्या कालावधीत केलेल्या कामाचा तपशील/अहवाल शासनास पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचेमार्फत सादर करणे आवश्यक आहे.

४. याबाबतचा खर्च “मागणी क्र. बी-१०, ४०५५ - पोलीस यावरील भांडवली खर्च, ८०० इतर खर्च, (००) (०९) सीसीटीव्ही यंत्रणा बसविणे (४०५५ ०२२३) या अंतर्गत १३-कार्यालयीन खर्च ” या लेखाशीर्षाखाली सन २०२५-२६ च्या उपलब्ध तरतूदीतून भागविण्यात यावा.

५. सदर निधी कोषागारातून आहरित करण्यासाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना “नियंत्रक अधिकारी” म्हणून घोषित करण्यात आले आहे. तर त्यांच्या अधिनस्त आहरण व संवितरण अधिकाऱ्याला “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात आले आहे.

६. सदर शासन निर्णय, वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम,दि.१७.०४.२०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, भाग-पहिला, उपविभाग-चार, मधील अनुक्रमांक ११ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार तसेच प्रशासकीय विभागाला असलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे. याबाबतचा खर्च त्या-त्या आर्थिक वर्षाच्या मंजूर तरतूदीतून करण्यात यावा.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५११०७१६१९३६५६२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJENDRA TANAJI BHALWANE

Digitally signed by RAJENDRA TANAJI BHALWANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=38d121bf4a170d16dacf98520f0ac44551976931d2758148ccaa24d1fb27b9df, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BADFC0DAA40CC485400AAD9CEABCD514095659A6CDFAC856815518DCD188C23A, cn=RAJENDRA TANAJI BHALWANE
Date: 2025.11.07 16:21:58 +05'30'

**( रा. ता. भालवणे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान, मंत्रालय, मुंबई.
७. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. पोलीस आयुक्त, पुणे.
९. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड.
१०.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
११. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१३. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
१४.मे. पीडब्ल्युसी (PricewaterhouseCoopers), २५२, वीर सावरकर मार्ग, दादर(प.), मुंबई-४०००२८.
१५. निवडनस्ती, पोल-३